चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२१ मार्च, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# होळीच्या पार्श्वभुमीवर जिल्हात विविध ठिकाणी अवैध दारू आणि जुगारावर कार्यवाही

दिनांक २०/०३/२०१९ रोजी होळी सणाच्या पार्श्वभुमिवर जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा तसेच जुगार अडयावर कार्यवाही करण्यात आली.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **विरूर, चंद्रपुर शहर, बल्लारशाह, दुर्गापुर, ब्रम्हपुरी, चिमुर, वरोरा, नागभिड, घुग्घुस, माजरी, सिंदेवाही, सावली, राजुरा, कोठारी, उमरीपोतदार, पिट्टीगुडा, गडचांदुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **३५** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन १३ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **४,३१,३००/—रू.** चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

## तसेच चंद्रपर पोलीसांची जुगार अडयावरील कार्यवाही पुढिलप्रमाणे

**पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी** अंतर्गत मौजा नवेगाव आणि मेंडकी या दोन वेगवेगळया ठिकाणी आरोपी ईसम हे सार्वजनिक ठिकाणी सटट्ापटट्ीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **ब्रम्हपुरी** येथे अप. क्र. **२०५/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर दोन गुन्हयात ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **६१०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

———————————————————————————————————

# निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर घुग्घुस पोलीसांची कार्यवाही
# १ लक्ष ९५ हजाराची रोकड जप्त

दिनांक १९/०३/२०१९ रोजी होळी सण आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर पोलीस स्टेशन घुग्घुस अंतर्गत वर्धा नदी बेलोरा एसएसटी पॉईन्टवर नाकाबंदी दरम्यान एका चारचाकी वाहनातुन १ लक्ष ९५ हजाराची रोख जप्त करण्यात आली.

पोलीस स्टेशन घुग्घुस अंतर्गत वर्धा नदी बेलोरा एसएसटी पॉईन्ट येथे नाकाबंदी करण्यात आली होती. सदर नाकाबंदी दरम्यान वाहनांची तपासणी करीत असतांना रात्री ०८/३० दरम्यान मारोती अल्टो वाहन क्र. एमएच ३४ एए ४८४३ या वाहनाची तपासणी करीत असतांना त्यामध्ये ०१ लक्ष ९५ हजाराची रोख रक्कम मिळुन आली. सदर रोख रक्कमे बाबत तपासणी पथकाला समाधानकारक उत्तर न मिळाल्याने सदरची रक्कम जप्त करून जिल्हाधिकारी यांचे कार्यालय निवडणुक अधिकारी चंद्रपुर यांचे कडे पाठविण्यात आली आहे. पुढिल तपास घुग्घुस पोलीस करीत आहे.

---